# राज्यातील कुपोषित बालकांच्या बालमृत्यु संदर्भात संनियंत्रण समितीची सभा
# दिनांक २२ नोव्हेंबर २०१०

राज्यातील कुपोषित बालकांच्या बालमृत्यु संदर्भात संनियंत्रण समितीची १२ वी सभा दिनांक २२ नोव्हंबर २०१० रोजी राज्य कुटुंब कल्याण पुणे कार्यालयात डॉ.रजनीकांत आरोळे समितीचे अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. सभेच्या सुरुवातीस डॉ. व्ही.के.रोकडे, सहाय्यक संचालक, कु.क. कार्यालय पुणे यांनी उपस्थितांचे स्वागत केले व सभेस सुरुवात झाली. बैठकीस खालील पदाधिकारी व समिती सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) डॉ.रजनीकांत आरोळे | - | समिती अध्यक्ष. |
| २) डॉ.डी.एस.डाखुरे | - | सदस्य सचिव तथा संचालक आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य मुंबई. |
| ३) डॉ.यु.एच.गावंडे | - | अतिरिक्त संचालक ( कु.क.) पुणे |
| ४) श्री.राजुरकर ज्ञा.स. | - | आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक |
| ५) श्री.ए.एच.मानकर, | - | उपायुक्त, आयसीडीएस. |
| ६) श्री.जी.आर.शिंदे | - | उपायुक्त, आयसीडीएस |
| ७) श्री.भीम रासकर | - | समिती सदस्य तथा संचालक, महिला राजसत्ता आंदोलन, नवी मुंबई |
| ८) डॉ.गोपाळ पंडगे | - | युनिसेफ सल्लागार, माताबाल आरोग्य |
| ९) श्री.वि.गं.पांडे | - | प्रकल्प व्यवस्थापक, कर्मग्राम धारणी |
| १०) डॉ.किशोर चपळगांवकर | - | समिती सदस्य |
| ११) डॉ.श्याम अष्टेकर | - | समिती सदस्य, नाशिक |
| १२) श्रीमती मेधा कुलकर्णी | - | समिती सदस्य तथा विश्वस्त, संपर्क संस्था, मुंबई |
| १३) एकनाथ गागरे | - | कक्ष अधिकारी अन्न व नागरी पुरवठा व ग्रा.संरक्षण विभाग, मंत्रालय मुंबई |
| १४) डॉ.शशिकांत अहंकारी | - | समिती सदस्य तथा अध्यक्ष, हॅलो मेडीकल फौंडेशन उस्मानाबाद |
| १५) डॉ.मृदुला फडके | - | समिती सदस्य तथा युनिसेफ सल्लागार |
| १६) श्री.बी.यु.राणे | - | नियोजन विभाग |
| १७) डॉ.वाय.पी.मुळे | - | सहा.संचालक मुंबई |
| १८) श्रीमती शीराज प्रभु | - | समिती सदस्य |
| १९) डॉ.सी.पी.जयस्वाल | - | युनिसेफ सल्लागार |
| २०) डॉ.व्ही.के.रोकडे | - | सहा.संचालक (कु.क.) |
| २१) डॉ.एस.के.डोंगरे | - | सहा.जि.आ.अ. धारणी, अमरावती. |

# बैठकीमध्ये विषय सूचीप्रमाणे खालील निर्णय घेण्यात आले.

| अ.क्र. | विषय, झालेली चर्चा व घेण्यात आलेले निर्णय | करावयाची कार्यवाही | जबाबदार अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | दिनांक २४-६-२०१० रोजी झालेल्या सभेतील इतिवृत्ताला मान्यता देणे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल | दिनांक २४-६-२०१० रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्ताला सर्व विभागाच्या अधिका-यांनी व समिती सदस्यांनी मान्यता दिली. | अतिरीक्त संचालक, राकुकका, पुणे. |
| २ | कुपोषण संनियंत्रण समितीने केलेल्या अंतरीम शिफारशीवरील कार्यवाही अहवाल. सर्व विभागांनी अहवाल सादर केले. | पुढील सभेच्या वेळेला अद्ययावत अहवाल सभेमध्ये सादर करावेत. | सर्व विभाग |
| ३ | कुपोषण, भूकबळी संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालय / उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिकांची सद्यस्थिती | सदर याचिकांबाबतची प्रगती अहवाल प्रत्येक सभेत सादर करावा. | सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा संचालनालय मुंबई. |
| ४ | संनियंत्रण समितीच्या निर्णयावर व कुपोषण कमी करण्यासाठी विविध विभागांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल :-<br>१) ३ वर्षापर्यन्तच्या वयोगटासाठी अंगणवाडी कार्यकर्तीमार्फत अन्न वाटप होत असते आणि ३ ते ६ वयोगटाला बचत गटामार्फत ही कार्यवाही चालू आहे. परंतु बचतगटाच्या महिलांना या (THR) | <br><br><br>१) ०६ महिने व ३ वर्षे या वयोगटासाठी THR (टेक होम रेशन) ही योजना सर्वत्र राबविली जाते. यासाठी सत्तु, शिरा व उपमा फक्त शिजवून तयार करण्यासाठी वाटप करण्यात येतो. ३ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांना | सर्व विभाग<br><br><br>महिला बाल कल्याण विभाग व आरोग्य विभाग (अतिरिक्त संचालक, कु.क, पुणे.) |

| अ.क्र. | विषय, झालेली चर्चा व घेण्यात आलेले निर्णय | करावयाची कार्यवाही | जबाबदार अधिकारी |
|---|---|---|---|
| | आहार वाटपाची पध्दत माहिती नसते असे निदर्शनास आल्याचे श्रीमती शिराज प्रभु समिती सदस्या यांनी निदर्शनास आणून दिले. यावर काय कार्यवाही करता येईल. | बचतगटामार्फत आहार वाटप होतो, ही आहार वाटपाची पध्दत जनतेला माहिती होण्यासाठी प्रसार होणे आवश्यक आहे. यासाठी आजच्या बैठकीचा व चर्चेचा संदर्भ देवून रितसर सूचना निर्गमित केल्या जातील. यासाठीची कार्यपध्दती आरोग्य विभागामार्फत ठरविण्यात येईल. | |
| | २) अंगणवाडी मुलांची उपस्थिती, वजन व कुपोषण स्थिती. | २) ३० ते ३५ टक्के तालुके कुपोषणग्रस्त आहेत. काही तालुक्यामध्ये हे प्रमाण ८० टक्के आहे. यासाठी राजमाता जिजाऊ मिशन औरंगाबाद यांनी जी योजना व कृतीकार्यक्रम राबविला त्याप्रमाणे जोखीमग्रस्त भागासाठी ही कार्यवाही करावी. सध्या जागतिक आरोग्य संघटनेने दिल्याप्रमाणे सर्वसाधारण, कमी वजनाचा आणि तीव्र कमी वजनाचा अशा पध्दतीने वजनाची आकडेवारी उपलब्ध आहे. मा. सचिव महिला व बाल कल्याण (ए.बा.वि.यो.) यांचेशी याबाबत चर्चा करुन लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल.<br>गंभीर तीव्र व मध्यम तीव्र कुपोषणाबाबत राजमाता जिजाऊ मिशनमार्फत प्रशिक्षकांचे प्रशिक्षण संपूर्ण राज्यामध्ये सुरु केले आहे. प्रा.आ.केंद्र स्तरावर वै.अ., | आरोग्य व महिला बाल कल्याण विभाग |

| अ.क्र. | विषय, झालेली चर्चा व घेण्यात आलेले निर्णय | करावयाची कार्यवाही | जबाबदार अधिकारी |
|---|---|---|---|
| | | अंगणवाडी कार्यकर्ती, मुख्य सेविका, व इतर पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण घेतले आहे. याबाबत डॉ.फर्नांडीस यांनी टिप्पणी (लर्निंग नोट) तयार केली आहे. वैद्यकीय महाविद्यालये (MUHS) व इंडियन असोसिएशन ऑफ पेडियाट्रेशियन यांनाही सॅम / मॅम च्या पध्दतीच्या वापराचा समावेश करुन घेतला पाहिजे. | |
| | ३) रोजगार हमी योजना - मजुरांना वेळेत वेतन मिळण्याबाबत केलेली कार्यवाही व किती रोजगार उपलब्ध आहेत याची सद्यस्थिती | ३) २८-६-२०१० च्या परिपत्रकानुसार मजुरांच्या वेतन अदा करण्यामध्ये सुधारणा करण्यात येवून ६ दिवसांच्या कामाचे मोजमाप करुन बॅंक अथवा पोस्टामार्फत रोजगार दिला जातो. जास्तीत जास्त ५ कि.मी अंतरावरच रोजगार उपलब्ध करुन दिला जातो. सध्या राज्यात १,२२,४०६ रो.ह.यो. अंतर्गत कामे चालू आहेत परंतु जिल्हानिहाय किती कामे चालू आहेत याची आकडेवारी देता आली नाही. समितीने जिल्हानिहाय कामांची आकडेवारी व त्यातील मजुरांची आकडेवारी याची मागणी केली. | |

| अ.क्र. | विषय, झालेली चर्चा व घेण्यात आलेले निर्णय | करावयाची कार्यवाही | जबाबदार अधिकारी |
|---|---|---|---|
| | ४) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग – | ४) सुधारीत नियमानुसार दारिद्रय रेषेखालील कार्डधारकांना ३५ कि. व दारिद्रय रेषेवरील कार्डधारकांना १५ किलो धान्य दिले जाते.<br>ठाणे जिल्हयातील जनसुनवाईचा अहवाल याही सभेत सादर केला नाही. | राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान |
| ५ | अंगणवाडीतील मुलांची तिमाही तपासणी/ ग्रेड ३ व ४ मुलांचा उपचार / अतिगंभीर मुलांवरील उपचार, नवसंजीवनी आढावा.:-<br>अंगवाडीतील मुलांची नियमित तपासणी व स्थलांतर होणा–या मुलांची तपासणी याबाबत सविस्तर चर्चा झाली. साखर कारखाने , विट भटटी व इतर ठिकाणी मजुरी करणा–या मजुरांच्या मुलांना व अंगणवाडी लाभधारक यांचेसाठी आहार देण्याची काय व्यवस्था आहे याची विचारणा मा. समिती अध्यक्षांनी केली असता मा.संचालक आरोग्य सेवा यांनी बीड जिल्हयात १० ऑक्टोबर रोजी आयुर्मंगलम हा मा. राष्ट्रपती यांचे हस्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमामध्ये | जागतिक आरोग्य संघटनेने ठरवून दिलेल्या मानकानुसार मुलांची तपासणी करावयाची आहे. ज्या मुलांना कोणतेही गंभीर आजार नाहीत अशा मुलांचीही तपासणी वैद्यकिय अधिकारी यांनी करावयाची आहे. कुपोषित बालकांच्या मृत्युचे प्रमाण ज्या ठिकाणी ४० टक्केपेक्षाही जास्त आहे अशी गावे शोधावयाची आहेत. व त्या ठिकाणी मोबाईल अंगणवाडी सुरु करावयाची आहे.<br>३ ते ६ वयोगटासाठी टेक होम रेशन ची योजना मुंबईमध्ये नियमित राबविली जाते व तसा शासन निर्णय निर्गमित झाला आहे. ही योजना महाराष्ट्रातील सर्व जिल्हयामध्ये राबविण्याबाबत निर्णय झाला.<br>बीड जिल्हयाप्रमाणे इतर जिल्हयात कार्यवाही रोजगार हमी योजना विभाग, आरोग्य विभाग व महिला व | अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा ( कु.क.) पुणे<br>रोजगार हमी योजना,<br>महिला व बाल विकास विभाग |

| अ.क्र. | विषय, झालेली चर्चा व घेण्यात आलेले निर्णय | करावयाची कार्यवाही | जबाबदार अधिकारी |
|---|---|---|---|
| | वयोगटानुसार कार्ड वाटप झाले आहे त्याचप्रमाणे सर्व जिल्हयामध्ये कार्यवाही करता येईल. | बालविकास विभाग यांनी करावयाची आहे. | |
| ६ | जिल्हानिहाय अंगणवाडी / मिनी अंगणवाडी स्थापनेची सद्यस्थिती व गरज | सध्या ९७४६२ अंगणवाडी उपलब्ध आहेत व ८८२७२ कार्यरत आहेत. अंगणवाडी कार्यकर्तीच्या नियुक्तीकरीता आमदार अध्यक्ष असल्याने विलंब होत आहे, प्रचंड भ्रष्टाचार झाला आहे व होत आहे हे निदर्शनास आणून दिले. यामध्ये लातुर जिल्हयातील १५ ऑगस्टची घटना निदर्शनास आणून दिली. याकरता निवड समितीमध्ये आमदार नसावेत याबाबत शासनास प्रस्ताव सादर केला आहे परंतु अद्याप मान्यता मिळाली नाही. कमिटीचा टी. ओ.आर. संदर्भ देऊन शासनास पुन्हा प्रस्ताव सादर करावा. | मा. सचिव, महिला व बाल विकास विभाग, व मा. आयुक्त, आयसीडीएस |
| ७ | जिल्हानिहाय अर्भक मृत्यु / बालमृत्यु नोंदणीची स्थिती आणि बालमृत्युच्या कारणांचे सर्वेक्षण. अंगणवाडी मार्फत होणारी जन्ममृत्यु नोंदणीची माहिती महिला व बाल विकास विभाग यांनी समितीला सादर करणे. | वेबसाईटवर प्रसारीत केलेल्या माहिती प्रत प्रत्येक सभेमध्ये सादर करावी. | मा. आयुक्त, महिला व बालविकास विभाग |

| अ.क्र. | विषय, झालेली चर्चा व घेण्यात आलेले निर्णय | करावयाची कार्यवाही | जबाबदार अधिकारी |
|---|---|---|---|
| ८ | समिती सदस्यांना ओळखपत्र देणे. | समिती सदस्यांना ओळखपत्र देण्यासाठी सर्व समिती सदस्यांचे पत्ते व फोटो देण्यात यावेत. | सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा, मुंबई. |
| ९ | स्थलांतरीत कामगार, मजूर लोकांची माहिती ठेवणे. आरोग्य, एकात्मिक बालविकास व उद्योग विभागामध्ये योग्य समन्वय असणे आवश्यक आहे. | उद्योग विभागाने स्थलांतरीत होणाऱ्या मजूरांची तसेच याबाबत योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे. स्थलांतरीत मजूरांच्याबाबत योग्य माहिती उपलब्ध न झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कार्यवाही व्हावी. | उद्योग विभाग |
| १० | ० ते ६ वर्ष वयोगटातील मुलांसाठी टी.एच.आर. एकाचवेळी व सर्व ठिकाणी देणेबाबत कार्यवाही याबाबत अध्यक्षांनी विशेष लक्ष देण्याबाबत सूचना दिली. | एकात्मिक बालविकास विभागामार्फत याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. व पुरवठा विभागामार्फत याबाबत लक्ष घालण्यात यावे. | एकात्मिक बालविकास विभाग व पुरवठा विभाग |
| ११ | स्थलांतर होणाऱ्या ० ते ६ वर्ष वयोगटातील मुलांकरीता ट्रॅकिंग सिस्टीम तयार करणे. | तीन महिन्याच्या आत एकात्मिक बालविकास विभागाने याबाबत जरुर ती कार्यवाही करावी. नाव निहाय पाठपुरावा करुन अशा बालकांना टेक होम रेशन (THR) देण्यात यावे. | एकात्मिक बालविकास विभाग |
| १२ | बीड जिल्हयातील आर्यु मंगलम योजनेअंतर्गत स्थलांतरीत कुटूंबाला कार्ड देण्यात आलेले आहे. याबाबत बाकी जिल्हयांमध्ये काय स्थिती आहे. | बीड जिल्हयाप्रमाणेच इतर स्थलांतरीत होणाऱ्या जिल्हयामध्ये संबंधित कुटूंबांना कार्ड देणेबाबत कार्यवाही. | ग्राम विकास विभाग |

| अ.क्र. | विषय, झालेली चर्चा व घेण्यात आलेले निर्णय | करावयाची कार्यवाही | जबाबदार अधिकारी |
|---|---|---|---|
| १३ | अंगणवाडीमध्ये टी.एच.आर. देण्याबरोबरच शैक्षणिक कामकाजाबाबत अपेक्षित वाढ दिसून येत नाही. | आहाराबाबत तसेच मुलांच्या शैक्षणिक बाबींकडे विशेष लक्ष दिले जावे.तसेच मुलांना जागेवर खाऊ खाण्यास देण्याबाबत विशेष लक्ष दिले जावे. | एकात्मिक बालविकास विभाग |
| १४ | अन्न धान्य साठवणूक व्यवस्था असमाधानकारक आहे. | याबाबत शासनाकडे कोणत्या प्रकारच्या उपाययोजना आहेत व सुधारणा करण्याबाबत काय करता येईल. | अन्न धान्य व पुरवठा विभाग |
| १५ | अन्न धान्य वाटप व रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीबाबत समिती सदस्य यांनी वेगळी बैठक घेऊन विचारविनमय करावा. | समिती सदस्य यांनी याबाबत उपाययोजना सुचवाव्यात. | समिती सदस्य |
| १६ | अंगणवाडी सेविकेच्या भरती प्रक्रियेबाबत | सद्यस्थितीत कमी अंसलेल्या अंगणवाडी सेविकेच्या भरतीबाबत आचार संहितेचा उल्लंघनाबाबतचा प्रश्न उपस्थित होत असल्याने समितीमध्ये अशासकिय सदस्य शक्य तो असू नये. | महिला व बाल विकास विभाग |
| १७ | अंगणवाडी भरतीबाबत होणारा भ्रष्टाचार व घोटाळा | श्रीमती कुलकर्णी, श्रीयुत रासकर व श्रीमती शिराळकर तसेच एकात्मिक बालविकास विभाग यांचे एक सदस्य यांनी याबाबत शहानिशा करावी.<br>यासाठी समितीतील श्री. रासकर, श्रीमती कुलकर्णी व श्रीमती शिराज प्रभू यांची नावे निश्चित केली गेली. | समिती सदस्य व एकात्मिक बालविकास विभाग |

| .क्र. | विषय, झालेली चर्चा व घेण्यात आलेले निर्णय | करावयाची कार्यवाही | जबाबदार अधिकारी |
|---|---|---|---|
| १८ | ० ते ६ वर्ष वयोगटातील कुपोषित मुलांची यांदी प्रथम सत्रात आदिवासी जिल्हयांकरीता तयार करणे. | उपायुक्त, एकात्मिक बालविकास विभाग, यांनी याबाबतचा अहवाल वेब-साईटवर लोकांसाठी सादर करावा. | उपायुक्त, एकात्मिक बालविकास विभाग |
| १९ | वजन व उंचीनुसार कुपोषित मुलांचे वर्गीकरण | एकात्मिक बालविकास विभागाने व आरोग्य विभागाने याबाबत समन्वयाने काम करुन कृती आराखडा तयार करावा व पुढील बैठकीत अहवाल सादर करावा. | एकात्मिक बालविकास विभाग व आरोग्य विभाग |
| २० | मेळघाट विभागातील बालमृत्यू तसेच विविध आजारांचे सर्वेक्षण ११ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये २००८ मध्ये करण्यात आलेले आहे. त्याचा अहवाल समिती सदस्यांना देण्याबाबत. | समिती सदस्यांना सदर सर्वेक्षणाचा अहवाल आरोग्य विभागाने सादर करावा. | आरोग्य विभाग |
| २१ | अशा प्रकारे विषय सुचीप्रमाणे सर्व विषयांवर चर्चा झाल्यानंतर मा. अध्यक्षांनी उपस्थितांचे आभार मानले. | पुढील सभेचे स्थळ आणि तारीख मा. अध्यक्षांच्या सहमतीने ठरविण्याचे ठरले. | संचालक, आरोग्य सेवा, मुंबई. |

सदस्य सचिव तथा संचालक आरोग्य सेवा,
मुंबई.